CNR No.MHNB080014202021

| | | | | |
|---|---|---|---|---|
| दाखल दिनांक | – | २०.०८.२०२१ | | |
| नोंदणी दिनांक | – | २०.०८.२०२१ | | |
| निकाल तारीख | – | १६.०६.२०२६ | | |
| कालावधी | – | **वर्षे** | **महिने** | **दिवस** |
| | | ०४ | ०९ | २७ |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, नवापुर यांचे न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी श्रीमती बी.एच. परमार)**

**नि. फौ. ख. क्र.१०२/२०२१**

**निशाणी क्रमांक ७३/ब**

महाराष्ट्र शासन,
तर्फे विसरवाडी पोलीस स्टेशन अधिकारी,
ता. नवापुर, जि. नंदुरबार. ..... **अभियोगपक्ष**

**अधिवक्ताः**

**अभियोगपक्षातर्फेः**– सहा. सरकारी अभियोक्ता वाय. आर. मोरे.

**विरुध्द**

१. सागर उर्फ आदित्य सतीष वळवी
वय २३ वर्षे, व्यवसाय – मजुरी,

२. लाला उर्फ रोहित सुरेश वसावे,
वय २३ वर्षे, व्यवसाय– मजुरी,

३. सोमनाथ भामट्या वळवी,
वय २८ वर्षे, व्यवसाय – मजुरी,

४. राजु भटेसिंग गावीत,
वय २९ वर्षे, व्यवसाय –मजुरी,

५. अविनाश रमन मोरे,
वय २७ वर्षे, व्यवसाय– मजुरी,

६. गौरव भगवान मोरे,
वय २७ वर्षे, व्यवसाय –मजुरी,

७. निलेश रमन मोरे,
वय २० वर्षे, व्यवसाय– मजुरी,
सर्व रा. खांडबारा, ता. नवापुर, जि. नंदुरबार. ..... **आरोपीं**

**अधिवक्ताः**

**आरोपींतर्फेः**– विधीज्ञ आर.बी.कुलकर्णी

| | | |
|---|---|---|
| १. | गुन्हा घडल्याची तारीख | १६.०६.२०२१ |
| २. | प्रथम वर्दी अहवाल नोंदविल्याचा दिनांक | १७.०६.२०२१ |
| ३. | दोषारोपपत्र दाखल केल्याचा दिनांक | २०.०८.२०२१ |
| ४. | दोषारोप निश्चीत केल्याचा दिनांक | ११.०७.२०२२ |
| ५. | पुरावा सुरु केल्याचा दिनांक | ०१.०८.२०२३ |
| ६. | निकालासाठी राखीव ठेवल्याचा दिनांक | निरंक |
| ७. | निकाल घोषित केल्याचा दिनांक | १६.०६.२०२६ |
| ८. | शिक्षा सुनावली असल्यास आदेश दिनांक | निरंक |

**आरोपीची माहिती**

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामिनावर मुक्त दिनांक | ठेवण्यात आलेल्या दोषारोपाची कलमे | निर्दोष किंवा शिक्षा | शिक्षेचे वर्णन | कलम ४२८ फौ.प्र.सं. प्रमाणे कारागृह कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | सागर उर्फ आदित्य सतीष वळवी | १७.०६.२०२१ | १८.०६.२०२१ | कलम १४३, १४७, ३२३, ५०४, व ५०६ सह कलम १४९ भारतीय दंड संहितेन्वये | निर्दोष | निरंक | निरंक |
| २ | लाला उर्फ रोहित सुरेश वसावे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे |
| ३ | सोमनाथ भामट्या वळवी | १८.०६.२०२१ | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे |
| ४ | राजु भटेसिंग गावीत | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे |
| ५ | अविनाश रमन मोरे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे |
| ६ | गौरव भगवान मोरे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे |
| ७ | निलेश रमन मोरे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे |

## सरकार पक्ष / बचाव पक्ष / न्यायालय तर्फे साक्षीदारांची यादी

**अ. सरकार पक्षः–**

| साक्षीदार क्र. | साक्षीदाराचे नांव | साक्षीदाराची वर्गवारी | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| १. | दिक्षीत रामसिंग वळवी | फिर्यादी | ४७ |
| २. | सागर रामसिंग वळवी | साक्षीदार | ५० |
| ३. | रमेश सुपा गावीत | साक्षीदार | ६२ |
| ४. | तुषार उतऱ्या वळवी | साक्षीदार | ६३ |
| ५. | रमुबाई रमेश गावीत | साक्षीदार | ६४ |

**ब. बचाव पक्षाच्या साक्षीदारांची यादीः–** निरंक.

**क. न्यायालयाचे साक्षीदारांची यादीः–** निरंक.

## सरकार पक्ष / बचाव पक्ष/ न्यायालय तर्फे दस्तऐवजांना निशाणी देण्यात आलेली यादी

**अ. सरकार पक्षः–**

| अनुक्रमांक | निशाणी क्र. | दस्तऐवज विवरण | दस्तऐवज निशाणी देण्यात आलेले साक्षीदारांचे क्र. |
|---|---|---|---|
| १. | ४८ व ४९ | फिर्याद व प्रथमखबरी अहवालवरील सहीस | सा.क्र.१ |

**ब. बचाव पक्षः–**

**क. न्यायालयातर्फे निशाणीः–**

| अनुक्रमांक | निशाणी क्र. | दस्तऐवज विवरण |
|---|---|---|
| १. | २६ | दोषारोप |

| | | |
|---|---|---|
| २. | ६६ ते ७२ | आरोपींचे कलम ३१३ अन्वये निवेदन |

**ड. मुद्देमाल / वस्तुः–** निरंक

## न्यायनिर्णय

(घोषित तारीखः १६ जुन, २०२६)

सदरील खटला आरोपीं विरुध्द कलम १४३, १४७, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम १४९ भारतीय दंड संहितेन्वये चालविण्यात आलेले आहे.

**थोडक्यात अभियोगपक्षाचे कथन खालील प्रमाणे आहे..**

२. दिनांक १६.०६.२०२१ रोजी रात्री ९.३० वाजेचे सुमारास फिर्यादी, त्याचा भाऊ सागर, तुषार वळवी, विलास वळवी असे भादवड गावचे बाहेर खांडबारा रोडवर हॉटेल निसर्गवर चहा पिण्यासाठी गेले असतांना फिर्यादी व आरोपीं गप्पा मारत असतांना आरोपींनी आपल्या नवापुर शहरात जय आदिवासी ब्रिगेड संघटना चालु करायची आहे असे सांगितले असता फिर्यादीने त्या संघटनेचा अध्यक्ष नाही असे सांगितले. त्यावेळी आरोपींनी तुम्ही फक्त आम्हाला साथ द्या बाकीचे आम्ही पाहुन घेवु असे सांगितले. त्यावेळी फिर्यादीने तुम्हाला संघटना काढायची आहे तर काढा आम्ही त्यात काम करणार नाही असे सांगितले असता आरोपींनी त्याचा राग आल्याने फिर्यादी व साक्षीदार यांना हाताबुक्यांनी मारहाण केली व वाईट शिवीगाळ करुन जीवे मारण्याची धमकी दिली. त्यांनंतर फिर्यादी यांनी आरोपींविरुध्द पोलीस स्टेशन विसरवाडी येथे घटनेबाबत फिर्याद दिली.

३. माहितीदेणार/फिर्यादी यांचेकडुन मिळालेल्या माहिती प्रमाणे पोलीसांनी आरोपीं विरुध्द गुन्हा क्रमांक ३०२/२०१९ कलम १४३, १४७, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम १४९ भारतीय दंड संहितेन्वये नोंद केला व तपासाअंती आरोपी यांचे विरुध्द कलम १४३, १४७, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम १४९ भारतीय दंड संहितेन्वये दोषारोप पत्र दाखल केले.

४. माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी प्रस्तुत प्रकरणात दिनांक ११.०७.२०२२ रोजी निशाणी क्र. २६ अन्वये आरोपीं विरुध्दकलम १४३, १४७, ३२३, ५०४ व ५०६

सह कलम १४९ भारतीय दंड संहितेन्वये गुन्हा केल्याबाबत दोषारोप निश्चीत केला आरोपी यांनी त्यांच्यावरील दोषारोप मान्य न करता खटला चालविण्याची विनंती केली.

५. प्रस्तुत प्रकरणातील आरोपीचे कलम ३१३ फौजदारी प्रकिया संहितेचा जबाब अभिलेखावर आरोपींचे निशाणी क्र.६६ ते ७२ अन्वये जबाब नोंदविण्यात आला.

६. अभियोगपक्षाचे कथानक व आरोपीं विरुध्द निश्चित करण्यात आलेला दोषारोप पाहता माझ्या समोर पुढील विचारार्थ बाबी उपस्थित होतात त्या वरील माझे निष्कर्ष मी पुढील विवेचणासह खालील प्रमाणे नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **विचारार्थ बाब** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | आरोपी हे बेकायदेशीर जमावाचे सदस्य होते व दिनांक १६.०६.२०२१ रोजी रात्री ०९.३० वाजेच्या सुमारास मौजे बर्डीपाडा, खांडबारा येथील हॉटेल निसर्ग येथे फिर्यादी व साक्षीदार यांचेवर दहशत निर्माण करण्याचे सामाईक उद्दीष्ट असलेले जमावाचे सदस्य होते आणि कलम **१४३** भारतीय दंड संहितेन्वये गुन्हा केला हे अभियोगपक्षाने शाबीत केले आहे काय ? | नाही. |
| २ | आरोपी हे बेकायदेशीर जमावाचे सदस्य होते वरील नमुद, तारीख, वेळ व ठिकाणी बेकायदेशीर फिर्यादी/माहितीदेणार व साक्षीदार यांना मारहाण करुन दुखापत करणेचा गुन्हा करणे हे पुर्ण करत असतांना दंगलीचा गुन्हा केला आणि कमलम **१४७** भारतीय दंड संहितेन्वये गुन्हा केला हे अभियोगपक्षाने शाबीत केले आहे काय ? | नाही. |
| ३ | आरोपी हे बेकायदेशीर जमावाचे सदस्य होते व वरील नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींनी फिर्यादी व साक्षीदार यांना हाताबुक्यांनी मारहाण करुन त्यांना | नाही. |

| | | |
|---|---|---|
| | दुखापत केली आणि म्हणुन कलम **३२३** सह कलम **१४९** भारतीय दंड विधाना नुसार गुनहा केला हे अभियोगपक्षाने शाबीत केले आहे काय ? | |
| ४ | आरोपी हे बेकायदेशीर जमावाचे सदस्य होते वरील नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींनी फिर्यादीस व साक्षीदार यांना शिवीगाळ करुन सार्वजनीक शांततेचा भंग केला व त्यांना प्रक्षोभित करुन कलम **५०४** सह कलम **१४९** भारतीय दंड संहिते नुसार गुन्हा केला हे अभियोगपक्षाने शाबीत केले आहे काय? | नाही. |
| ५ | आरोपी हे बेकायदेशीर जमावाचे सदस्य होते वरील नमुद तारीख, वेळ व ठिकाणी माहितीदेणार/फिर्यादी व साक्षीदार यांना घाबरविणेचा हेतुने त्यांना जिवेठार मारण्याची धमकी देऊन धकदपटशा करुन कलम **५०६** सह कलम **१४९** भारतीय दंड विधानानुसार गुन्हा केला हे अभियोग पक्षाने शाबीत केले आहे काय? | नाही. |
| ६ | आदेश काय? | आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## <u>कारणमिमांसा</u>

### <u>विचारार्थ बाब क्र. १ ते ५ साठीः-</u>

७. आरोपी यांचे विरुध्द दोषारोप सिध्द करण्याकरिता माहितीदेणार/ फिर्यादी साक्षीदार क्र. १ दिक्षीत रामसिंग वळवी यांना निशाणी क्र. ४७ वर, साक्षीदार क्र. २ सागर रामसिंग वळवी यांना निशाणी क्र. ५० वर, साक्षीदार क्र.३ रमेश सुपा गावीत यांना निशणी क्र.६२ वर, साक्षीदार क्र.४ तुषार उतऱ्या वळवी यांना निशाणी क्र. ६३ वर आणि साक्षीदार क्र.५ रमुबाई रमेश गावीत यांना निशाणी क्र.६४ वर अभियोगपक्षाने तपासले.

८. साक्षीदार क्र. १ दिक्षीत रामसिंग वळवी हे प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादी असुन त्यांनी त्यांचे साक्षीत असे कथन केले आहे की, घटना दोन ते तीन वर्षापुर्वी निसर्ग हॉटेल, खांडबारा जवळ रात्री ९.०० वाजेच्या सुमारास घडली होती. त्यादिवशी ते व तुम्ही चहा पिण्यासाठी गेले होते. तुम्ही सर्व बसलेले असतांना चेष्टा करत असतांना तोडी वाद झाला. त्यानंतर त्यांनी रागाच्या भरात पोलिस स्टेशनला फिर्याद दाखल केली. त्यांनी पुढे असे कथन केले की फिर्यादीवर त्यांची सही आहे मात्र त्यात काय लिहले होते हे त्यांना माहित नाही. उलटतपासादरम्यान प्रस्तुत साक्षीदाराने त्यांचा व आरोपीचा न्यायालयाबाहेर आपसात समझोता झाला असल्याचे कथन केले आहे. तसेच, आरोपींविरुध्द त्यांची कोणतीही तक्रार राहिलेली नसुन तयांना प्रस्तुत खटला त्यांना पुढे चालवावियाचा नसल्याचे मान्य केले आहे.

९. साक्षीदार क्र. २ सागर रामसिंग वळवी त्यांनी त्यांचे साक्षीत असे कथन केले आहे की, घटना कधी व कोठे घडली हे त्यांना माहित नाही. घटनेच्या दिवशी काय घडले हे त्यांना माहित नसल्याचे सांगितले आहे. उलटतपासादरम्यान प्रस्तुत साक्षीदाराने त्यांचा व आरोपीचा न्यायालयाबाहेर आपसात समझोता झाला असल्याचे कथन केले आहे. तसेच, सदर साक्षीदाराने उलटतपासणीत इतर सर्व सुचक प्रश्नांना नकारार्थी उत्तरे दिली.

१०. साक्षीदार क्र.३ रमेश गावीत त्यांनी त्यांचे साक्षीत असे कथन केले आहे की, दिनांक १६.०६.२०२१ रोजी ते शौचास बाहेर गेले होते. तेथुन येत असतांना खांडबारा येथील दोन इसम एका मोटारसायकलवर डबलसिट येत होते व त्यांच्या हातात टिकमचा दांडा ते फिरवत येऊन त्यांनी मारला होता. त्यानंतर ते खांडबारा येथील सरकारी रुग्णालय उपचारासाठी गेले होते. त्यांनी पुढे असे कथन केले की, त्यांना कोणी मारले हे त्यांना माहित नाही. उलटतपासादरम्यान प्रस्तुत साक्षीदारांनी त्यांनी आरोपींना पाहिलेले नाही, घटना कधी व काय घडली हे त्यांना माहित नसल्याचे मान्य केले आहे.

११. साक्षीदार क्र.४ तुषार उतऱ्या वळवी आणि साक्षीदार क्र.५ रमुबाई रमेश गावीत यांनी त्यांच्या साक्षीत असे कथन केले आहे की, घटनेच्या वेळी त्यांना कोणी मारहाण केली हे त्यांना माहित नाही. उलटतपासादरम्यान प्रस्तुत साक्षीदारांनी त्यांनी आरोपींना पाहिलेले नाही, घटना कधी व काय घडली हे त्यांना माहित नसल्याचे, तसेच त्यांना कोणी मारहाण केली हे माहित नसल्याचे मान्य केलेले आहे.

१२. सहा. सरकारी अभियोक्ता यांनी न्यायालयाचे परवानगीने फिर्यादी व साक्षीदार यांना उलटतपासात विचारण्याजोगे व सुचक प्रश्न विचारुन अभियोगपक्षाचे कथानक अभिलेखावर सिध्द करण्याचा प्रयत्न केला परंतु साक्षीदारांनी सुचक प्रश्नांना नकारार्थी उत्तरे दिली आहेत व पुर्णपणे अभियोगपक्षाचे कथानकास पुष्टी दिली नाही. तसेच, उलटतपासादरम्यान फिर्यादीने त्यांच्या उलटतपासात त्याचे आरोपीं सोबत न्यायालयाबाहेर समझोता झाला असल्याचे मान्य केले आहे.

१३. एकंदरीत फिर्यादी व साक्षीदार यांनीच आरोपी यांचे सोबतचा वाद मिटला असल्याचे कथन करुन अभियोगपक्षास सहकार्य केलेले नाही. सदरील फिर्यादी व साक्षीदारांनी सरतपासामध्ये किंवा उलटतपासादरम्यान अभियोगपक्षाचे कथानकास पुर्णपणे दुजोरा दिलेला नाही. सदरील साक्षीदारांनी त्यांच्या साक्षीत त्यांना आरोपींनी मारहाण केल्याचे कोठेहे कथन केलेले नाही. त्यामुळे आरोपी क्र.१ ते ७ यांनी समान उद्दिष्टाच्या पुरःसरणार्थ बेकायदा जमाव जमवून, फिर्यादी व साक्षीदार यांना हातबुक्यांनी मारहाण करुन शिवीगाळ केली व त्यांना जिवे मारण्याची धमकी दिली ह्या बाबी फिर्यादी व साक्षीदार यांनी अभियोगपक्षास पुर्णपणे सहकार्य न केल्यामुळे सिध्द होऊ शकल्या नाहीत. फिर्यादी व्यक्तीनेच अभियोगपक्षास सहकार्य न केल्यामुळे आरोपींनीकलम १४३, १४७, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम १४९ भारतीय दंड संहितेन्वये गुन्हा केला हे सिध्द होऊ शकले नाही, त्यामुळे मी विचारार्थ बाब क्रमांक १ ते ५ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>विचारार्थ बाब क्र. ६ साठीः–</u>**

१४. अभियोगपक्ष आरोपी विरुध्द दोषारोप सिध्द न करु शकल्यामुळे आरोपी हे निर्दोष होण्यास पात्र आहे, त्यामुळे मी विचारार्थ बाब क्र. ६ चे अनुषंगाने खालील प्रमाणे अंतीम आदेश पारित करित आहे..

## आदेश

| | |
|---|---|
| १ | आरोपी क्र. १ सागर उर्फ आदित्य सतीष वळवी, आरोपी क्र. २ लाला उर्फ रोहित सुरेश वसावे, आरोपी क्र. ३ सोमनाथ भामट्या वळवी, आरोपी क्र. ४ राजु भटेसिंग गावीत, आरोपी क्र. ५ अविनाश रमन मोरे, आरोपी क्र. ६ गौरव भगवान मोरे आणि आरोपी क्र. ७ |

| | |
|---|---|
| | निलेश रमन मोरे यांची कलम २४८(१) फौजदारी प्रक्रीया संहिता अन्वये, कलम १४३, १४७, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम १४९ भारतीय दंड संहितेन्वये गुन्हयाचे आरोपातुन निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |
| २ | आरोपींचे वयैक्तीक जातमुचलका व हमीपत्र रद्द करण्यात येतो. |
| ३ | आरोपींनी कलम ४३७ (अ) फौजदारी प्रक्रिया संहिते प्रमाणे प्रत्येकी रक्कम रु.१५,०००/– वैयक्तीक बंधपत्र व जामीन सादर करावा. |
| (न्यायनिर्णय खुल्या न्यायपिठात घोषित). | |

BHAVIKA HUKAMRAJ PARMAR
Digitally signed by BHAVIKA HUKAMRAJ PARMAR
Date: 2026.06.16 17:25:58 +0530

ठिकाण – नवापुर. **(बी.एच. परमार)**

दिनांक – १६.०६.२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, नवापुर.

जिल्हा नंदुरबार.

## दाखला

दाखला देण्यात येतो की, पी.डी.एफ. फाईलमधील मजकूर हा मुळ न्यायनिर्णय / आदेशा प्रमाणेच आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | – | मयुर धर्मराज पाटील,<br>लघुलेखक (श्रेणी–२), |
| न्यायालयाचे नांव | | न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, नवापूर, |
| आदेश जाहीर केल्याचा तारीख | – | १६.०६.२०२६ |
| आदेशावर न्यायाधीशांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | – | १६.०६.२०२६ |
| आदेश अपलोड केल्याची तारीख | – | १६.०६.२०२६ |